# प्रेसनोट

दि.१७/१०/२०२२

## उपजिल्हा रूग्णालय ता. दौंड येथील वैद्यकीय अधिकारी व शिपायावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७अ व १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४३ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक -<br>१) संग्राम माणिकराव डांगे, वय - ४६ वर्षे, पद – प्रभारी वैद्यकीय अधीक्षक, वर्ग – १, उपजिल्हा रूग्णालय, दौंड,<br>२) नानासाहेब पांडुरंग खोत, वय - ५७ वर्षे, पद - शिपाई, उपजिल्हा रूग्णालय ता. दौंड, जि.पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- दि. १३/१०/२०२२, दि. १४/१०/२०२२ व १७/१०/२०२२
सापळा दिनांक व ठिकाण :- १७/१०/२०२२, उपजिल्हा रूग्णालय ता. दौंड

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे दुबार विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी आरोपी लोकसेवक संग्राम डांगे यांचेसाठी ३,०००/- रूपये व आरोपी लोकसेवक नानासाहेब खोत, याचेसाठी २,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक नानासाहेब खोत यानी तक्रारदार यांचेकडे स्वतःसाठी २,०००/- रूपये व आरोपी लोकसेवक संग्राम डांगे यांच्याकरीता ३,०००/- रूपये लाचेची मागणी केली.त्या लाच मागणीस आरोपी लोकसेवक संग्राम डांगे यानी प्रोत्साहन दिले. आरोपी लोकसेवक १ व २ यांनी तक्रारदार यांचेकडे ५ हजार रूपये लाच मागणी करून ती स्वीकारल्यावर त्या दोघांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१९.हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२०.ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२१.व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
२२.व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
२३.ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
२४.वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.